सरकारी वकीलांचे कार्यालय, उच्च न्यायालय, अपिल शाखा (रिट सेल), मुंबई या कार्यालयाकरिता एमटीएनएल, कुपरेज या इमारतीमधील ७ व्या मजल्यावरील जागा भाडे तत्त्वावर उपलब्ध करुन देण्यासाठी येणाऱ्या खर्चास मंजूरी देण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
विधि व न्याय विभाग
शासन निर्णय क्र.सवरी-१४१७/प्र.क्र.११७/१७/का-८
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई : ४०० ०३२
दिनांक : २९ नोव्हेंबर, २०१७

<u>संदर्भ</u> : १) विधि व न्याय विभागाचा समक्रमांकाचा दि.३१.८.२०१७ चा शासन निर्णय.
२) सरकारी वकीलांचे कार्यालय, उच्च न्यायालय, अपिल शाखा (रिट सेल), मुंबई यांचे जा.क्र.आस्था/प्रस्ताव/१२२०६, दि.०४.०९.२०१७ चे पत्र.
३) विधि व न्याय विभागाचे समक्रमांकाचे दि.१४.९.२०१७ चे शुध्दीपत्रक.
४) सरकारी वकीलांचे कार्यालय, उच्च न्यायालय, अपिल शाखा (रिट सेल), मुंबई यांचे जा.क्र.आस्था/प्रस्ताव/३८, दि.२२.०९.२०१७ चे पत्र.
५) विधि व न्याय विभागाचे समक्रमांकाचे दि.०५.१०.२०१७ चे शुध्दीपत्रक.
६) सरकारी वकीलांचे कार्यालय, उच्च न्यायालय, अपिल शाखा (रिट सेल), मुंबई यांचे जा.क्र.आस्था/प्रस्ताव/१२५२६, दि.१८.०९.२०१७ चे पत्र.
७) विधि व न्याय विभाग, शासन निर्णय क्र.पुनर्वि-२०१७/प्र.क्र.७९/का.२३, दि.१२.१०.२०१७ चा शासन निर्णय.
८) सरकारी वकीलांचे कार्यालय, उच्च न्यायालय, अपिल शाखा (रिट सेल), मुंबई यांचे जा.क्र.आस्था/प्रस्ताव/१३८६८, दि.१८.११.२०१७ चे पत्र.

<u>प्रस्तावना</u> :

एमटीएनएल, कुपरेज या इमारतीमधील ७ व्या मजल्यावरील अतिरिक्त ७००० चौ.फु. इतकी जागा रु.२८९.४० प्रति चौ.फु. या दराने सरकारी वकील, उच्च न्यायालय, अपील शाखा (रिट सेल), मुंबई या कार्यालयास भाडेतत्वावर उपलब्ध करुन देण्यासाठी आवश्यक असणाऱ्या खर्चास संदर्भ क्र.१ येथील दि.३१.८.२०१७ च्या शासन निर्णयान्वये प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात आली होती. तथापि, सरकारी वकील, उच्च न्यायालय, अपील शाखा (रिट सेल), मुंबई यांनी संदर्भ क्र.२ येथील दि.४.९.२०१७ च्या पत्रान्वये प्रस्तावांतर्गत जागा ही ७००० चौ.फु. इतकी नसून ती ६३८५ चौ.फु. इतकी असून सध्याच्या दरात ५ टक्के इतकी वाढ झालेली आहे असे कळविले होते. त्यानुसार "अतिरिक्त ७००० चौ.फु. इतकी जागा" याऐवजी "अतिरिक्त ६३८५ चौ.फु. इतकी जागा", तसेच "रु.२८९.४० प्रति चौ.फु." याऐवजी "रु.३०३.८७ प्रति चौ.फु." व "प्रति महिना रु.२०,२५,८००/-" याऐवजी "रु.१९,४०,२१०/-" तसेच "वार्षिक रु.२,४३,०९,६००/-" याऐवजी "वार्षिक रु.२,३२,८२,५२०/-" अशी दुरुस्ती संदर्भ क्र.३ येथील दि.१४.९.२०१७ च्या शुध्दीपत्रकान्वये करण्यात आली आहे. तसेच "भाडे कराराच्या अनुषंगाने लागु होणाऱ्या करांच्या सर्व रक्कमेसही" अशी दुरुस्ती संदर्भ क्र.५ येथील दि.५.१०.२०१७ च्या शुध्दीपत्रकान्वये करण्यात आली आहे. सरकारी वकील, उच्च न्यायालय, अपील

शाखा (रिट सेल), मुंबई या कार्यालयाने संदर्भ क्र.६ येथील दि.१८.९.२०१७ च्या पत्रान्वये मागणी केल्याप्रमाणे एमटीएनएल, कुपरेज या इमारतीमधील ७ व्या मजल्यावरील ६३८५ चौ. फु. जागा भाडे तत्वावर उपलब्ध करुन देण्याकरिता येणारा खर्च भागविण्यासाठी रु.१,१६,४१,२६०/- (रुपये एक कोटी सोळा लाख एकेचाळीस हजार दोनशे साठ फक्त) एमटीएनएल, मुंबई यांना ६ महिन्याच्या भाडयाच्या रक्कमे इतकी अनामत रक्कम अदा करण्यासाठी मागणी क्र.जे १, २०१४-न्यायदान (दत्तमत) या प्रधान लेखाशिर्षाखाली मागणी क्र.जे-१,२०१४ न्यायदान, १०५ दिवाणी व सत्र न्यायालये, (०१) मुंबई शहर दिवाणी व सत्र न्यायाधीश, १०५ (०२)(०१) जिल्हा व सत्र न्यायाधीश (२०१४०१७२) या लेखाशीर्षातील "१३ कार्यालयीन खर्च" या उद्दिष्टातून रु.१,१६,४१,२६०/- (रुपये एक कोटी सोळा लाख एकेचाळीस हजार दोनशे साठ फक्त) एवढी रक्कम पुनर्विनियोजनाद्वारे मागणी क्र.जे-१, २०१४-न्यायदान, ११४ विधी सल्लागार व समुपदेशी, (००)(०१) विधी सल्लागार व समुपदेशी शहर अधिकारी (२०१४०२९९) (दत्तमत) या लेखाशिर्षातील "१३ कार्यालयीन खर्च" या उद्दिष्टात संदर्भ क्र.७ येथील दि.१२.१०.२०१७ च्या शासन निर्णयाद्वारे उपलब्ध करुन देण्यात आली आहे. सदरची रक्कम खर्च करण्यासाठी प्रशासकीय मंजूरी देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय :

सन २०१७-२०१८ या वित्तीय वर्षात सरकारी वकील, उच्च न्यायालय, अपील शाखा (रिट सेल), मुंबई या कार्यालयाकरीता एमटीएनएल, कुपरेज या इमारतीमधील ७ व्या मजल्यावरील भाडेतत्वावरील ६३८५ चौ.फु. जागेसाठी एमटीएनएल, मुंबई यांना ६ महिन्याच्या भाडयाच्या रक्कमे इतकी अनामत रक्कम अदा करण्यासाठी मागणी क्र.जे १, २०१४-न्यायदान (दत्तमत) या प्रधान लेखाशिर्षाखाली मागणी क्र.जे-१,२०१४ न्यायदान, १०५ दिवाणी व सत्र न्यायलये, (०१) मुंबई शहर दिवाणी व सत्र न्यायाधीश, १०५ (०२)(०१) जिल्हा व सत्र न्यायाधीश (२०१४०१७२) या लेखाशिर्षातील "१३ कार्यालयीन खर्च" या उद्दिष्टातून रु.१,१६,४१,२६०/-(रुपये एक कोटी सोळा लाख एकेचाळीस हजार दोनशे साठ फक्त) एवढी अनामत रक्कम पुनर्विनियोजनाद्वारे मागणी क्र.जे-१, २०१४-न्यायदान, ११४ विधी सल्लागार व समुपदेशी, (००)(०१) विधी सल्लागार व समुपदेशी शहर अधिकारी (२०१४०२९९)(दत्तमत) या लेखाशिर्षातील "१३ कार्यालयीन खर्च" या उद्दिष्टात संदर्भ क्र.७ येथील दि.१२.१०.२०१७ च्या शासन निर्णयाद्वारे उपलब्ध करुन देण्यात आलेल्या रक्कमेस खर्च करण्यासाठी या आदेशाद्वारे प्रशासकीय मान्यता देण्यात येत आहे.

२. मागणी क्र.जे-१, २०१४-न्यायदान, ११४ विधी सल्लागार व समुपदेशी (००)(०१) विधी सल्लागार व समुपदेशी, शहर अधिकारी (२०१४०२९९)(दत्तमत) या उप लेखाशिर्षाखाली "१४-भाडे व कर" हे उद्दिष्ट उपलब्ध नसल्याने "१३ कार्यालयीन खर्च" या उद्दिष्टाखाली रु.१,१६,४१,२६०/-(रुपये एक कोटी सोळा लाख एकेचाळीस हजार दोनशे साठ फक्त) एवढी अनामत रक्कम पुनर्विनियोजनाद्वारे उपलब्ध करुन देण्यात आली आहे.

३. प्रस्तुत शासन निर्णय वित्तीय अधिकार नियम पुस्तिका १९७८, भाग पहिला, उपविभाग एक, अनु.क्र.१०, नियम क्र.११५ अन्वये प्रशासकीय विभागांना प्रदान केलेल्या अधिकारान्वये तथा या विभागाच्या संदर्भ क्र.७ येथील दि.१२.१०.२०१७ च्या शासन निर्णयास अनुसरुन निर्गमित करण्यात येत आहे.

४. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०१७११२९१६०५१५१४१२ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने.

Akusing Narshi Vasave

Digitally signed by Akusing Narshi Vasave
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Law and Judiciary, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=5ab84183e07eb916b3161523e73f56110b7dfcea4b15e66c8dac75aa76eaad47, cn=Akusing Narshi Vasave
Date: 2017.11.29 16:08:06 +05'30'

(आ. न. वसावे)
सह सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

१) मा.मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांचे अपर मुख्य सचिव.
२) मा.राज्यमंत्री(विधि व न्याय विभाग) यांचे खाजगी सचिव.
३) सर्व विधानमंडळ सदस्य.
४) मा.मुख्य सचिवांचे उप सचिव, मंत्रालय, मुंबई-३२.
५) अतिरिक्त मुख्य सचिव (व्यय), वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.
६) प्रधान सचिव, सार्वजनिक बांधकाम विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.
७) प्रधान सचिव व विधि परामर्शी, विधि व न्याय विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.
८) सरकारी वकील, अपिल शाखा (रिट सेल), उच्च न्यायालय, मुंबई.
९) उप महाप्रबंधक (कुपरेज), ६ वा मजला, कुपरेज टेलिफोन एक्स्चेंज इमारत, एम.के.मार्ग, मुंबई.
१०) महालेखापाल, (लेखा परीक्षा/लेखा अनुज्ञेयता) महाराष्ट्र-१,मुंबई.
११) अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई.
१२) निवासी लेखापरीक्षा अधिकारी, मुंबई.
१३) वित्त विभाग/व्यय-५, मंत्रालय, मुंबई.
१४) विधि व न्याय विभाग/कार्या.२३, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२
१५) निवडनस्ती/का.८